# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.10.2024** **वार – शुक्रवार**

---

**अभिजात मराठी**

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणं हा भाषेचा गौरव आहे; आता आपल्याला भाषा विकास आणि प्रचार यादृष्टीने काम करावं लागेल, असं प्रतिपादन केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात केलं.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात पुणे पुस्तक महोत्सवातर्फे आनंदोत्सव साजरा करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी साहित्य, सामाजिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. आगामी काळात मराठी शाळांचा दर्जा सुधारणे, तिथली पटसंख्या वाढवणे याबाबत काम करावं लागेल, असं मोहोळ म्हणाले. पुढच्या अर्थसंकल्पात भाषेसाठी निधीची तरतूद करण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं. देशातील सर्व केंद्रीय विद्यापीठांमध्ये मराठी भाषेचं अध्यासन केंद्र सुरू व्हावं, कोणताही भेद न करता सर्व अभिजात भाषांना सम प्रमाणात निधी देण्यात यावा, अशी मागणी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी यावेळी केली. तर अभिजात दर्जा टिकवण्यात साहित्यिक, कलाकार यांचं योगदान मोठं असेल असं ज्येष्ठ वात्रटिकाकार रामदास फुटाणे म्हणाले. मराठीचा वापर प्रत्यक्षात दैनंदिन जीवनात झाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी केंद्र शासनाच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

**रब्बीहंगाम**

राज्यात यंदा झालेल्या चांगल्या पावसामुळे रब्बी हंगामात उच्चांकी पेरण्या होण्याचा अंदाज पुणे कृषी आयुक्तालयाच्या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. या हंगामात सुमारे ६६ लाख हेक्टरवर पेरणी होण्याचा अंदाज आहे. राज्यात रब्बी हंगामातील सरासरी लागवडी खालील क्षेत्र सुमारे ५४ लाख हेक्टर आहे. गेल्या वर्षी सुमारे ५९ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. यंदा त्यात वाढ होऊन विक्रमी ६६ लाख हेक्टरवर पेरा जाईल असा अंदाज आहे. तेलबियांमध्ये करडईचं क्षेत्र यंदा एक लाखांवर नेण्याचं; तर जवस लागवड २० हजार हेक्टरवर नेण्याचं कृषी विभागाचं उद्दिष्ट आहे.

**हर्षवर्धन पाटील**

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत आज राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मोठी घडामोड असल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**सेवाभवन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या पुण्यातल्या एरंडवणे इथल्या सेवा भवन प्रकल्पातील दिवंगत डॉ. भा. र. साबडे प्रशिक्षण दालनाचं उद्घाटन संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर यांच्या हस्ते आज करण्यात आलं. या प्रशिक्षण दालनामुळे डॉ. साबडे यांचं ज्ञान, त्यांचं कर्तृत्व आणि सेवावृत्ती यांची माहिती नव्या पिढीला मिळत राहील असं वंजारवाडकर यावेळी म्हणाले.

**संगीतसूर्य**

संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या शतकोत्तर तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त, 'संगीतसूर्याला मानाचा मुजरा' या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. केशवराव एखाद्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणे रंगभूमीवर चमकणारे स्वयंप्रकाशित सूर्य होते; ते आणखी काही वर्ष जगले असते, तर रंगभूमीचा इतिहासच बदला असता, असं मत केशवराव भोसले यांचे पणतू अशोक पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं.

**PCMC**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं फुगेवाडी इथल्या लोकमान्य बाळगंगाधर टिळक विद्यामंदिर शाळेच्या नवीन इमारतीमध्ये आठवी ते दहावी मधील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा उभारली आहे. या शाळेचं उद्घाटन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते नुकतच झालं.

**बाजार समिती बंद**

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी येत्या सोमवारी राज्यातील सर्व बाजार समित्यांमधील व्यवहार एक दिवस लाक्षणिकरित्या बंद राहणार आहेत. महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा यांनी ही माहिती दिली.

**नवरात्रमहोत्सव**

पुणे नवरात्र महोत्सवाचं उद्घाटन आज अखिल भारतीय महिला काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष अलका लांबा यांच्या हस्ते झालं. यावेळी 'तेजस्विनी' पुरस्कारांचं वितरण तसंच सुमारे ४०० पेक्षा अधिक आदर्श मातांचा सत्कार लांबा यांच्या हस्ते करण्यात आला.

**टेबलटेनिस**

जळगावमध्ये सुरू असलेल्या चौथ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या नैशा रेवस्करने 14 आणि 17 वर्षांखालील गटात उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. पुण्याच्याच प्रणव घोलकर, ईशान खांडेकर आणि कौस्तुभ गिरगावकर यांनी सतरा वर्षांखालील गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३२ आणि किमान तापमान २१ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहून दुपारनंतर हलक्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**